**प्रसिध्दीसाठी बातमी**

दि.०४.११.२०१९

# राष्ट्रीय सरासरी व मानकांपेक्षा राज्य बँकेचे आर्थिक निकष सरस

राष्ट्रीय बँक म्हणजे नाबार्ड यांनी विकसित केलेल्या **'परफॉर्मन्स असेसमेंट रिपोर्ट'** नुसार देशातील सर्व राज्य बँकांचा परफॉर्मन्स रिपोर्ट नाबार्ड कडून प्रकाशित होतो. सदर अहवाल प्रसिध्द करतांना दरवर्षीच्या जून, सप्टेंबर, डिसेंबर व मार्च अखेरील आकडेवारी विचारात घेतली जाते. त्यानुसार दि.३१ मार्च २०१९ अखेरील आकडेवारीवर नाबार्डने प्रसिध्द केलेल्या परफॅार्मन्स रिपोर्टमध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने जवळ जवळ सर्वच निकषांमध्ये राष्ट्रीय सरासरी व मानकांपेक्षा सरस कामगिरी केली आहे.

संबंधित अहवालातील महत्वाची आकडेवारी पुढीलप्रमाणे – १) भांडवल पर्याप्ततचे राष्ट्रीय मानांकन ९% तर राष्ट्रीय सरासरी १३.५९% इतकी असतांना राज्य बँकेने १५.६०% चा टप्पा गाठून स्थिरता मजबूत केली आहे. बँकेच्या प्रमुख भांडवलाचे एकूण मालमत्तेशी असलेले राष्ट्रीय मानंक ४.५% व राष्ट्रीय सरासरी ६.४२% असतांना राज्य बँकेने ९.६८% पर्यंत मजल मारली आहे. तसेच बँकिंग व्यवसायातील सर्वात महत्वाचा **'प्रोव्हीजन कव्हरेज रेशो'** चे राष्ट्रीय मानक ७०% असतांना राज्य बँकेने ७९.०९% चा टप्पा गाठला आहे. त्याचप्रमाणे कर्जावरील उत्पन्नाचे बाबतीत राष्ट्रीय सरासरी ७.५६% तर राज्य बँकेची ८.२९% गुंतवणूकीवरील उत्पन्नाची राष्ट्रीय सरासरी ७.४७% तर राज्य बँकेची ८.१९% आहे. कॉस्ट ऑफ फंडसूची राष्ट्रीय सरासरी ५.२७% असताना राज्य बँकेने ५.१६% पर्यंत घट करुन व्यापारी बँकांशी बरोबरी साधली आहे. व्यवस्थापनावरील खर्चाचे राष्ट्रीय मानक १.५% व राष्ट्रीय सरासरी ०.०३% असताना राज्य बँकेने हा खर्च केवळ ०.८७% इतका मर्यादित ठेवत व्याजातील निव्वळ दुराव्याचे प्रमाण (नेट इंटरेस्ट मार्जीन) १.८९% इतक्या राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त म्हणजे २.४२% इतके गाठले आहे.

अशा प्रकारे राष्ट्रीय पातळीवरील महत्वाच्या क्षेत्रात सरासरी निकषांपेक्षा राज्य बँकेने सरस कामगिरी केली आहे. मात्र अनुत्पादक कर्जाच्या निव्वळ प्रमाणाची राष्ट्रीय सरासरी ०.८४% असताना राज्य बँकेचे प्रमाण १.८१% असल्याने त्यामध्ये राज्य बँकेस सुधारणा करणे आवश्यक आहे. दि.३१ मार्च २०२० रोजी सदर प्रमाण ०% आणण्याचा राज्य बँकेचा निर्धार आहे. तसेच बचत व चालू खात्यावरील ठेवीचे एकूण ठेवींशी असलेल्या प्रमाणाची राष्ट्रीय सरासरी २१.०४% असताना राज्य बँकेचे प्रमाण १०.३५% इतके कमी असल्याने त्याचा परिणाम बँकेच्या नफा क्षमतेवर होत असून भविष्यात कमी खर्चाच्या ठेवीचे प्रमाण वाढविण्यावर लक्ष केंद्रित करण्याचे व्यवस्थापनाने निश्चित केले आहे.

दि.३१.०३.२०१६ अखेर असलेल्या बँकेच्या ३८ शाखांमध्ये दि.३१.०३.२०१९ अखेर ४७ पर्यंत वाढ झालेली असताना कर्मचाऱ्यांच्या संख्येमध्ये मात्र १२३७ वरुन १०६८ पर्यंत घट झालेली असल्याने प्रती कर्मचारी व्यवसायामध्ये राष्ट्रीय सरासरी ₹२६ कोटी १७ लाख असताना बँकेने ₹३२ कोटी ६३ लाख इतका टप्पा गाठल्याने प्रती शाखा व्यवसायाची राष्ट्रीय सरासरी ₹२६६ कोटी ३० लाख इतकी असताना राज्य बँकेने ₹७५४ कोटी ३ लाख इतका उच्चांकी व्यवसाय केला आहे. अशा प्रकारे राज्य बँक परिपूर्ण क्षमतेच्या उद्दिष्टांकडे यशस्वीपणे वाटचाल करीत आहे.

विद्याधर अनास्कर
प्रशासक